# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २९/०५/२०२४ (बुधवार) दुपार**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक
## पोलीस स्टेशन पारशिवनी ची कारवाई

दिनांक २८/०५/२०२४ रोजी पोलीस स्टेशन पारशिवनी येथील स्टाफ यांना गोपनीय माहीती मिळाली की, एक इसम आपले टॅक्टर क्र. एम एच— ४०/ए एम १०४० ला सलग्न विनानंबरची ट्रॅक्टर ट्रॉलीने मौजा डोरली शिवार येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून नमुद घटनास्थळी नाकाबंदी करून आरोपी क्र. ०१) राजकुमार महादेव बावणे, वय ३४ वर्षे, रा. सिंगोरी ता. पारशिवनी याने आरोपी क्र. ०२ मोरेश्वर दशरथ बलकी रा. डोरली ता. पारशिवनी याचे सांगण्यावरून आपले ताब्यातील ट्रॅक्टर क्र. एम एच— ४०/ए एम— १०४० ला सलग्न विना नंबरची ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये भरून विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळून आल्याने आरोपीच्या ताब्यातून ०१) निळया रंगाचा सोनालिका कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम एच— ४०/ए एम— १०४० किंमती ४,००,०००/— रू. २) विना क्रमांकाची लाल रंगाची ट्रॅक्टर ट्रॉली किंमती १,००,०००/— रू. ०३) एक ब्रास रेती किंमती ४०००/— रू असा एकूण ५,०४,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी पोहवा दिलीप टेकाम पोस्टे पारशिवनी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, १०९ भादवि सहकलम ४८ (7)(8) वा महा. जमीन महसुल अधि. सहकलम ४,२१ खान खनिजे अधिनियम १९५७ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा अमित यादव हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे पारशिवनी येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक राजेशकुमार थोरात, पोहवा दिलीप टेकाम, पोशि पृथ्वीराज चव्हान, राकेश बंधाटे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर